ePaper
बेस्ट कर्मचाऱ्यांना अर्धा पगार रोख तर अर्धा बँकेत जमा, चिल्लरवर उतारा
वर्ष - 8 । अंक - 339 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- बुमराला खेळविण्याकडे कल!
- प्रज्ञानंदची कार्लसनवर मात
- भारतातील सर्वात स्वच्छ शहर कोणतं?
- इराकच्या शॉपिंग मॉलमध्ये भीषण आग


www.mahaenews.com | ।शुक्रवार, दि. 18 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## विधान भवन परिसरात तुफान राडा : जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले !

# विधिमंडळ लॉबीत तुंबळ हाणामारी!

## आव्हाड-पडळकरांमध्ये धुमसत असलेल्या ज्वालामुखीचा अखेर विस्फोट

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते आ. जितेंद्र आव्हाड आणि भारतीय जनता पार्टीचे विधान परिषद सदस्य गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधान भवन परिसरात प्रचंड राडा झाला. कार्यकर्त्यांमध्ये तुंबळ हाणामारी झाली आणि विधिमंडळाच्या इतिहासातील सर्वात नामुष्कीचा प्रसंग ओढवला. आव्हाड आणि पडळकर यांच्यात गेले दोन-तीन दिवस शेरेबाजी, टोमणे, धमक्या देणे असे प्रसंग ओढवत होते, शेवटी त्याचा विस्फोट झाला आणि त्याचे पर्यावसान तुफान हाणामारीत झाले. या घटनेमुळे संपूर्ण राजकारण मात्र हादरून गेले आहे.**

## विधिमंडळाच्या इतिहासातील सर्वात नामुष्कीचा प्रसंग !



### विधान भवन लॉबीतच अघटित प्रसंग !

विधान भवन लॉबीतच दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांमध्ये तुंबळ हाणामारी झाली आणि बघता बघता त्याचा व्हीडिओ व्हायरल झाला..सगळीकडे संतप्त पडसाद उमटले. पडळकर आणि आव्हाड यांच्यात दोन दिवसांपूर्वी गाडीचा दरवाजा उघडण्यावरुन वाद झाला होता. त्यानंतर पडळकर यांना डिवचण्यासाठी आव्हाड यांनी लॉबीतून येताना मंगळसूत्र चोर, मंगळसूत्र चोर अशा घोषणा दिल्या होत्या. त्यामुळे पडळकर यांचे कार्यकर्ते संतप्त झाले होते.

### मी तुला घाबरतो का ?

मी काय तुला घाबरतो का,असे म्हणत आव्हाड आणि पडळकर यांचे कार्यकर्ते एकमेकांविरुद्ध शिवीगाळ करत चक्क विधानभवन परिसरातील लॉबीमध्ये भिडल्याचे पाहायला मिळाले. यावेळी, पडळकर समर्थकांकडून आव्हाड यांचा कार्यकर्ता असलेल्या नितीन देशमुख यांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर, दोन्ही बाजूने शिवीगाळ झाल्याचे पाहायला मिळाले.

### सुरक्षारक्षकांची तारांबळ

वास्तविक, विधानभवनाच्या लॉबीमध्ये पास शिवाय कोणालाही परवानगी नसते आणि अशा आत आलेल्या कोणत्या ना कोणत्या आमदाराच्या कार्यकर्त्यांना रोखायचे कसे, हा प्रश्न तेथील सुरक्षारक्षकांना पडला. त्यांनी पुढे येत ही भांडणे सोडवली. मात्र, तोपर्यंत घटना कॅमेऱ्यात कैद झाली आणि काही क्षणातच हा व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.

### मला ठार मारण्याचा प्रयत्न : आव्हाड

विरोधकांकडून घटनेचा तीव्र संताप व्यक्त होत असून मला मारण्याचा प्रयत्न झाल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे. आता, या घटनेवर मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

### गाडीचा दरवाजा उघडण्यावरून वाद..

पडळकर आणि आव्हाड यांच्यात गाडीचा दरवाजा उघडण्यावरुन दोन दिवसांपूर्वी वाद झाला होता. यावेळी, दोघांमध्ये शिवीगाळ झाल्याचा व्हीडिओ व्हायरल झाला. तर, आव्हाड यांनी विधानसभा परिसरातच अरे मंगळसूत्र चोराचा.. अशी घोषणाबाजी केल्याने दोन्ही नेत्यांच्या समर्थकांमध्ये सोशल मीडियावर वॉर सुरू होते. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या या राड्याचे पडसाद चक्क विधानभवन लॉबी, परिसरात पाहायला मिळाले. त्यावरुन, येथील आमदारांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला असून थेट विधानसभा अध्यक्षांकडेही याबाबत मागणी करण्यात आली आहे.

### उद्धव ठाकरेंची मागणी..

विधानसभा परिसरातील राड्यावर बोलताना, गुंडांच्या पोशिंद्यावरत आणि गुंडांवर मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी उद्धव ठाकरेंनी केली आहे. विधानभवन हे पवित्र मंदिर आहे, तेथे अशाप्रकारे मारामारी होत असेल तर हे चुकीचे आहे. लोकप्रतिनिधींना धक्काबुक्की होत असेल, मारहाण होत असेल तर हे चुकीचे आहे. विधानभवन प्रांगणामध्ये एवढा कडेकोट बंदोबस्त असताना हे लोक आतमध्ये कसे आले? यांना पास कुणी दिले? असा प्रश्नही उद्धव ठाकरेंनी विचारला.

### काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?

विधिमंडळ परिसरात झालेल्या राड्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढे येत प्रतिक्रिया दिली. घडलेली घटना योग्य नाही, मारामारी करणे, ती सुद्धा विधान भवनात करणे, योग्य नाही. विधानसभा अध्यक्ष आणि सभापतींच्या अंतर्गत हा परिसर येतो, त्यांनी घटनेची दखल घ्यावी. अध्यक्षांनी कडक कारवाई करावी, अशी विनंती मी केली आहे. हे विधानसभेला शोभणारे नाही, त्यामुळे कारवाई झालीच पाहिजे, असे म्हणत फडणवीस यांनी घडलेल्या प्रकारावर आपली भूमिका स्पष्ट केली.

### राऊत यांची प्रतिक्रिया

भारतीय जनता पक्षाने विधीमंडळात आणि त्यांच्या पक्षात गुंड टोळ्या आणल्या आहेत, देवेंद्र फडणवीस यांच्या काळात महाराष्ट्र राज्याची संस्कृती उद्ध्वस्त झाली आहे, फडणवीस हे गृहमंत्री आहेत, त्यांच्या नाकासमोर विधानभवनात दंगल झाली! विधानभवनात दंगल केली ते आ. पडळकर टीम देवेंद्रचे सदस्य आहेत.

# लोककला आर्थिक महामंडळ स्थापन करा!

## विठाबाई नारायणगावकर यांच्या नातवाची मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील लोककलावंतांच्या उन्नतीसाठी 'स्व. विठाबाई नारायणगावकर लोककला आर्थिक महामंडळ' स्थापन करावे, तसेच तमाशाची कला पंढरी असलेल्या नारायणगाव येथे विठाबाई नारायणगावकर यांचे स्मारक उभारावे, अशी मागणी विठाबाईंचे नातू मोहित नारायणगावकर यांनी केली आहे.**



याबाबत नारायणगावकर यांनी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडे निवेदन दिले. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, आमदार अमोल मिटकरी, राष्ट्रवादी काँग्रेस सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश उपाध्यक्ष नितीन धवणे पाटील, अभिनेत्री अपेक्षा चव्हाण आदी या प्रसंगी उपस्थित होते.राज्यातील पहिला तमाशा महोत्सव २००६ मध्ये नारायणगाव येथे झाला होता. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी नारायणगाव या ठिकाणी कृष्णा खोरे महामंडळाच्या दोन एकर जागेवर विठाबाई नारायणगावकर यांचे स्मारक करण्याचे जाहीर केले होते. मात्र, अद्याप अंमलबजावणी झालेली नाही,' असे नारायणगावकर यांनी सांगितले.'राज्यात तमाशा, जागरण-गोंधळ, वाघ्या-मुरळी, खडीगंमत वगनाट्य, गोंधळी, वासुदेव, पिंगळा, पोतराज, बहुरूपी, कलगी-तुरा, भारुड, पोवाडा, नंदीवाले, दशावतार, नमन, कोळी नृत्य, डोंबाऱ्याचा खेळ, झाडेपट्टी, वारली चित्रकार, भजन, कीर्तन, आदिवासी नृत्य, रेडाली, खान्देशी तमाशा, लावणी, संगीत बारी आदी लोककला अस्तित्वात आहेत. महामंडळ स्थापन झाल्यास या कलाकारांना आधार मिळू शकेल,' असे नारायणगावकर यांनी स्पष्ट केले.याबाबत नारायणगावकर यांनी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडे निवेदन दिले. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, आमदार अमोल मिटकरी, राष्ट्रवादी काँग्रेस सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश उपाध्यक्ष नितीन धवणे पाटील, अभिनेत्री अपेक्षा चव्हाण आदी या प्रसंगी उपस्थित होते.राज्यातील पहिला तमाशा महोत्सव २००६ मध्ये नारायणगाव येथे झाला होता. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी नारायणगाव या ठिकाणी कृष्णा खोरे महामंडळाच्या दोन एकर जागेवर विठाबाई नारायणगावकर यांचे स्मारक करण्याचे जाहीर केले होते. मात्र, अद्याप अंमलबजावणी झालेली नाही,' असे नारायणगावकर यांनी सांगितले.'राज्यात तमाशा, जागरण-गोंधळ, वाघ्या-मुरळी, खडीगंमत वगनाट्य, गोंधळी, वासुदेव, पिंगळा, पोतराज, बहुरूपी, कलगी-तुरा, भारुड, पोवाडा, नंदीवाले, दशावतार, नमन, कोळी नृत्य, डोंबाऱ्याचा खेळ, झाडेपट्टी, वारली चित्रकार, भजन, कीर्तन, आदिवासी नृत्य, रेडाली, खान्देशी तमाशा, लावणी, संगीत बारी आदी लोककला अस्तित्वात आहेत. महामंडळ स्थापन झाल्यास या कलाकारांना आधार मिळू शकेल,' यांनी स्पष्ट केले.

### अद्याप अंमलबजावणी झालेली नाही

नारायणगावकर यांनी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडे निवेदन दिले. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, आमदार अमोल मिटकरी, राष्ट्रवादी काँग्रेस सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश उपाध्यक्ष नितीन धवणे पाटील, अभिनेत्री अपेक्षा चव्हाण आदी या प्रसंगी उपस्थित होते.राज्यातील पहिला तमाशा महोत्सव २००६ मध्ये नारायणगाव येथे झाला होता. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी नारायणगाव या ठिकाणी कृष्णा खोरे महामंडळाच्या दोन एकर जागेवर विठाबाई नारायणगावकर यांचे स्मारक करण्याचे जाहीर केले होते. मात्र, अद्याप अंमलबजावणी झालेली नाही,' असे नारायणगावकर यांनी सांगितले.'

# ४३० खाटांचे रुग्णालय उभारण्याचे आव्हान!

## वैद्यकीय महाविद्यालयाची मान्यता राहण्यासाठी कामाला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने सुरू करण्यात येत असलेल्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाची मान्यता रद्द होऊ नये, यासाठी पुढील चार महिन्यांत ४३० खाटांचे रुग्णालय सुरू करण्याचे आव्हान महापालिकेसमोर आहे.**




महाविद्यालयासारखा महत्त्वाचा प्रकल्प उभारण्याचा संकल्प करताना महाविद्यालयासाठी आवश्यक असलेल्या रुग्णालयाचे नियोजन न केल्याने हे काम रखडले वैद्यकीय महाविद्यालयाला परवानगी मिळविताना ४३० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येईल, असे महापालिकेने सांगितल्यानंतर राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने (एनएमसी) महाविद्यालयाला मान्यता दिली होती. मात्र, आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याने, तसेच महाविद्यालय प्रशासन आवश्यक त्या नियमांची पूर्तता करीत नसल्याचा ठपका ठेवून गेल्या महिन्यात राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने महापालिकेला नोटीस बजावली होती. वैद्यकीय महाविद्यालयाची मान्यता रद्द का करू नये; तसेच एक कोटी रुपयांचा दंड का ठोठावू नये, अशी विचारणा केली होती.या पार्श्वभूमीवर त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी गुरुवारी वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रमुखांची बैठक घेतली. याबाबत नवल किशोर राम म्हणाले, 'चार महिन्यांत ४३० खाटांचे रुग्णालय उभारण्याचे आव्हान महापालिकेसमोर आहे. हे आव्हान प्रशासनाने स्वीकारले असून, त्यासाठी पावले टाकण्यास सुरुवात झाली आहे. वैद्यकीय महाविद्यालयाचे स्वप्न पाहताना त्यासाठी आवश्यक असलेल्या रुग्णालयाचे नियोजन करण्यात आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. नायडू सांसर्गिक रुग्णालयाच्या जागेत हे वैद्यकीय महाविद्यालय उभारले जात असून, जेथे रुग्णालय उभारण्याचे नियोजन केले आहे. तेथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असल्याने अडचणी आहेत. मात्र, त्यावर मात करत २८० खाटांचे रुग्णालय उभारले जाणार आहे.'कमला नेहरु रुग्णालयाचे बळकटीकरण केले जाणार आहे. तेथेदेखील काही खाटांची संख्या वाढवून त्याचा उपयोग वैद्यकीय महाविद्यालयासाठी केला जाणार आहे. यासाठी सुमारे ७०० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा करून हा निधी राज्य सरकारमार्फत मिळविण्याचा प्रयत्न आहे. निधी उपलब्ध होईपर्यंत महापालिका खर्च करणार असून, यासाठी कर्जदेखील उचलण्याची महापालिकेची तयारी आहे.

### 1400 कोटी खर्चाचा अंदाज

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचे काम महापालिकेने सुरू केले आहे. यासाठी तीन भागांचे बांधकाम केले जाणार आहे. हे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. यासाठी ७०० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. मात्र, महाविद्यालयासाठी आवश्यक असलेले प्रशस्त रुग्णालय महापालिकेकडे अद्यापही उपलब्ध नसल्याने त्याचे बांधकाम सुरू करून पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

## शहराचा देशात सातवा, राज्यात पहिला क्रमांक

# स्वच्छ सर्वेक्षणात पिंपरी-चिंचवड शहराची भरारी!

### 7 स्टार गार्बेज फ्री सिटी व वॉटर प्लस असे पुन्हा एकदा मिळविले मानांकन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड: केंद्र सरकारने स्वच्छ भारत अभियानांतर्गत घेतलेल्या स्वच्छ सर्व्हेक्षण स्पर्धेत पिंपरी-चिंचवड शहराचा देशात ७ वा तर राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्याचबरोबर ७ स्टार गार्बेज फ्री सिटी व वॉटर प्लस असे पुन्हा एकदा मानांकन मिळविले आहे. गतवर्षी स्वच्छ सर्वेक्षणामध्ये शहराचा देशात १० वा तर राज्यात तिसरा क्रमांक प्राप्त झाला होता. यावेळी शहराचा राज्यात पहिल्यांदाच प्रथम क्रमांक आला आहे.**




दिल्ली येथे आज झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय नगरविकास, शहरी मंत्री मनोहरलाल खट्टर, राज्यमंत्री तोखन साहू यांच्या हस्ते महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य विभागाचे उपआयुक्त सचिन पवार यांनी पुररस्कार स्विकारला. यावेळी सचिव श्रीनिवास कटिथिली, सेक्रेटरी रुपा मिश्रा, महापालिकेचे कार्यकारी अभियंता हरविंदरसिंह बन्सल, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांच्यासह आदी अधिकारी उपस्थित होते.

स्वच्छ भारत मिशन (शहरी) अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयामार्फत दरवर्षी शहरांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नागरिक सहभाग, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, शौचालये व मलनिस्सारण व्यवस्थेचे मूल्यांकन केले जाते. २०२४ च्या या स्पर्धेमध्ये देशातील चार हजार ५८९ शहरांनी भाग घेतला, त्यात पिंपरी-चिंचवड शहराने सातव्या क्रमांक मिळविला आहे. कचरा मुक्त शहर महापालिकेच्या विविध उपाययोजनांमुळे संपूर्ण शहरात कचऱ्याचे योग्य प्रकारे संकलन, वर्गीकरण, पुनर्वापर आणि विल्हेवाट लावण्याचे कार्य नियमितपणे केले जात आहे. प्रत्येक प्रभागात घराघरातून ओला आणि सुका कचरा वेगवेगळा संकलित केला जातो. स्रोताजवळ प्रक्रिया युनिट्स, कंपोस्टिंग, रीसायकलिंग प्लांट, बायोगॅस यंत्रणा आदींचा वापर केला जात आहे. यामुळे शहराने ७ स्टार कचरा मुक्त शहर (गार्बेज फ्री सिटी) हे प्रतिष्ठेचे मानांकन प्राप्त केले आहे.

शहरात मलनिस्सारणाची कार्यक्षम व्यवस्था, सीवेज ट्रिटमेंट प्लांट, नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण आणि पुर्नवापर यामध्ये चांगले काम केले आहे. स्वच्छ सर्वेक्षण यशस्वी होण्यासाठी केवळ महापालिकेचे नव्हे, तर शहरातील नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शाळा व उद्योगांचे मोठे योगदान लाभले. नागरिकांनी नियमित कचरा वर्गीकरण, प्लास्टिकचा कमी वापर, सार्वजनिक स्वच्छता यामध्ये सक्रीय सहभाग घेतल्याची माहिती आरोग्य विभागाचे उप आयुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

> महापालिकेला स्वच्छ सर्वेक्षणमध्ये मिळालेला पुरस्कार कौतुकास्पद असून, आता पुढील उद्दिष्ट म्हणजे शाश्वत स्वच्छता, घनकचरा शून्य धोरण, जलपुनर्वापर आणि पर्यावरणपूरक शहर यासाठी प्रयत्न करणार आहोत.
>
> **-विजयकुमार खोराटे,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

#### स्वच्छ सर्वेक्षणात शहराचा वाढता आलेख

| वर्ष | | क्रमांक |
|---|---|---|
| 2016 | - | 9 |
| 2017 | - | 72 |
| 2018 | - | 43 |
| 2019 | - | 52 |
| 2020 | - | 24 |
| 2021 | - | 19 |
| 2022 | - | 19 |
| 2023 | - | 10 |
| 2024 | - | 7 |

> शहरातील स्वच्छतेसाठी झटणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे, सफाई कर्मचारी, अधिकारी वर्ग, आणि स्वयंसेवी संस्थांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. हा सन्मान आपणा सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. येत्या काळात आपली जबाबदारी आणखी वाढली असून,त्यादृष्टीने आणखी अनेक शाश्वत उपक्रम राबविले जातील.
>
> **- शेखर सिंह,**
> आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.

> पिंपरी-चिंचवड महापालिकेला स्वच्छतेसाठी मिळालेला पुरस्कार कौतुकास्पद आहे. शहर स्वच्छतेसाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी, शहरातील प्रत्येक नागरिकांनी केलेल्या सहकार्यामुळेच आज देशात ७ वा तर राज्यात पहिला क्रमांक आला आहे. यापुढील काळात आणखी जोमाने शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी प्रयत्न करू. पुढील वर्षी देशात प्रथम क्रमांक यावा, यासाठी आतापासूनच विशेष खबरदारी घेतली जाईल.

## तुकोबांच्या पालखीचे शनिवारी शहरात होणार जंगी स्वागत!

### पालखी मार्गाचा अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी घेतला आढावा

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेऊन जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची पालखी परतीच्या प्रवासाला निघाली असून या पालखीचे आगमन पिंपरी चिंचवड शहरात शनिवारी (१९ जुलै ) रोजी दुपारी होत आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालयाजवळील चौकात पालखीचे स्वागत करण्यात येणार आहे.**




त्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी संबंधित विभागप्रमुखांसोबत बैठक घेऊन तयारीचा सविस्तर आढावा घेतला.

या बैठकीस सह शहर अभियंता देवन्ना गट्टूवार, माणिक चव्हाण, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, तानाजी नरळे, अतुल पाटील, अजिंक्य येळे, किशोर ननावरे, अश्विनी गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार, शिवराज वाडकर,अभिमान भोसले, सुनीलदत्त नरोटे,विजयसिंह भोसले, हेमंत देसाई, महेश बरिदे, चंद्रकांत मुठाळ, दिलीप भोसले, गणेश राऊत, संतोष दुर्गे, बाळू लांडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबधित क्षेत्रीय कार्यालयातील सहाय्यक आरोग्याधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जगतगुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा शनिवारी (१९ जुलै ) रोजी पिंपरी गांव येथील भैरवनाथ मंदिर येथे मुक्काम असणार आहे.त्या अनुषंगाने पालखी मार्गावर स्वच्छता, विद्युत व्यवस्था, वैद्यकीय मदत केंद्रे, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वाहतूक व्यवस्थापन, रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी,आरोग्य,वैद्यकीय, पाणीपुरवठा, विद्युत, उद्यान तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी आपापसात समन्वय साधून नियोजनबद्ध काम करावे अशा सूचना अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी बैठकीत दिल्या.

रविवार २० जुलै रोजी पालखी पिंपरी येथून लिंकरोड भाटनगर मार्गे चिंचवडगाव,चिंचवड स्टेशन (पहिली विश्रांती) ,के.एस.बी.चौक (दूसरी विश्रांती), लांडेवाडी चौक (दुपारचा मुक्काम), भोसरी,आळंदी रोड,मॅगझिन चौक,थोरल्या पादुका (तिसरी विश्रांती), धाकट्या पादुका मार्गे श्री.संत ज्ञानेश्वर महाराज मंदीर,आळंदी येथे मुक्कामी जाणार आहे. तर सोमवारी २१ जुलै रोजी पालखी आळंदीहून देहूफाटा, डुडुळगाव ,नागेश्वर मंदीर मोशी, चिखली, तळवडे, विठ्ठलवाडी मार्गे जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज मंदीर देहू याप्रमाणे प्रवास करणार आहे. महापालिकेच्या वतीने मार्गावरील स्वच्छता, पिण्याचे पाणी,फिरते शौचालय, प्राथमिक उपचार केंद्रे, आणि रूग्णवाहिकेची व्यवस्था तसेच विद्युत विभागाकडून रस्त्यांवर प्रकाशयोजना, तात्पुरते एल.ई.डी.दिवे व सी.सी.टि.व्ही. यंत्रणा बसवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



### साधन अनन्यतेने सांभाळावे.

एकदा असे झाले की एक बाई बाळंतीण झाली, आणि ताबडतोब तिच्या मुलाला दुसरीकडे नेले. पुढे काही वर्षांनी त्या दोघांची भेट झाली, तेव्हा मुलाला ही माझी आई, आणि त्या बाईला हा माझा मुलगा, हे ओळखता आले नाही. तशासारखे आपले झाले आहे. आपण इथे कशाकरिता आलो हेच विसरलो आहोत. खरे म्हणजे, आपण काही एका निश्चित कार्याकरिता जन्मलो आहोत; ते म्हणजे मनुष्यदेहात परमात्म्याची ओळख करून घेणे, हे होय. परंतु आपण विषयात पडल्यामुळे परमार्थाची ओळख विसरलो, विषयातच आनंद मानू लागलो आणि त्यातच सुख मिळावे अशी आशा करीत राहिलो. पण विषयच जर खोटा, तर त्यापासून सुख तरी कसे मिळणार ? आणि जे सुख मिळते, तेही अंती खोटेच ठरते ! म्हणून विषयापासून आपण विरक्त व्हावे तेव्हाच भक्ती करता येते. जिथे विषयविरक्ती झाली तिथेच भक्तीला सुरुवात होते. गुरू तरी काय करतो ? तर विषय हे खोटे आहेत, त्यात आपल्याला सुख मिळणार नाही, हेच दाखवितो. म्हणून, तो जे सांगेल तसे वागणे यातच आपले हित असते. गुरूने सांगितल्याशिवाय जे जे साधन कराल, ते ते फक्त कष्टालाच कारण होईल. साधनाची कितीही आटाआटी केली आणि शरीराला कष्ट दिले, तरी ते व्यर्थ जातील. कारण गुरुव्यतिरिक्त जी खटपट, ती फारशी उपयोगाची नसते. गुरूने सांगितलेले साधन हलके मानून आपल्या मनाने केलेले साधन आपल्याला बरे वाटते, म्हणजे गुरूला गौणपणा दिल्यासारखे झाले ! वास्तविक पाहता, गुरू हा सर्वज्ञ आहे आणि तोच प्रत्यक्ष परमात्मा आहे, ही भावना दृढ झाली पाहिजे. ती तशी झाली म्हणजे त्याच्या वचनावर विश्वास बसतो, आणि गुरू सांगेल तेच साधन खरे असे वाटू लागते. गुरु तरी नाम हेच सत्य असे सांगतो, आणि नामस्मरणाला आणखी दुसऱ्या काही साधनांची गरज लागत नसते हे पटवून देतो. नाम हेच साधन आणि तेच साध्य होय, हे अक्षरश: खरे आहे. गुरूने सांगितलेले साधन पतिव्रतेसारखे निष्ठेने पाळले पाहिजे. ती जशी आपल्या पतीशिवाय जगात दुसरा पुरुषच नाही असे मानते, त्याप्रमाणे आपण आपले साधन सांभाळले पाहिजे. जो असा अनन्यतेने वागतो, त्यानेच गुरुआज्ञा प्रमाण मानली असे होते, आणि त्यामुळेच त्याला खरे सुख होते. कुठेतरी आपले प्रेम असावे, कुणावर तरी आपला विश्वास असावा, कुठेतरी आपलेपणा असावा. आपण त्याचे होऊन राहावे अशी नेहमी इच्छा धरावी. जितक्या अपेक्षेने आपण प्रपंचात सुख मिळविण्यासाठी धडपड करतो, तितकी सर्व अपेक्षा जर भगवंताकडे लावली तर आपल्याला सुख खात्रीने मिळेल यात शंका नाही. बोधवचन:- सद्गुरुआज्ञाप्रमाण। हेच साधनांतील साधन जाण॥



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**विधानसभेचा दिवस गाजला तो काँग्रेस नेते नाना पटोले यांनी हातात पकडून ठेवलेल्या पेन ड्राईव्हमुळे ! 'हनी ट्रॅप' मध्ये अडकलेले महाराष्ट्रातले मंत्री, प्रशासकीय अधिकारी यांची पोलखोल असलेला तो पेन ड्राईव्ह आहे म्हणे ! काहीतरी अल्प फायद्यासाठी 'हनी ट्रॅप' मध्ये अडकून तोंड काळे केलेली ही बडी धेंडे कोण याची उत्सुकता मात्र सगळ्यांनाच लागली आहे !**

# नानांच्या 'पेन ड्राईव्ह'मध्ये 'हनी ट्रॅप,' बड्या धेंडांच्या गळ्याला मात्र चाप !



### नाना पटोले आक्रमक..!

विधानसभेमध्ये नाना पटोले यांनी यासंदर्भातला 'पेन ड्राईव्ह' च दाखवला आणि हनी ट्रॅपचा उल्लेख त्यांच्या भाषणात केला, तेथून वातावरण तापण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रातले काही मंत्री, मोठमोठे अधिकारी हे सगळे 'हनी ट्रॅप' मध्ये अडकले आहेत, असे नाना पटोले यांनी दोन दिवसांपूर्वीच सांगितले होते. आता त्यांनी यासंदर्भातला पेन ड्राईव्हच दाखवला. शिवाय ठाणे, नाशिक, मुंबई ही 'हनी ट्रॅप' ची केंद्रे बनली आहेत, असा आरोपही त्यांनी केला आहे. माझ्याकडे पेन ड्राईव्ह आहे आणि सरकारचे मत असेल तर आम्ही तो दाखवू शकतो, असेही पटोले म्हणाले, यातच बरेच गुड सामावले आहे!

### नेमके काय म्हणाले नाना पटोले ?

पटोले काय म्हणाले, ते आधी पाहू या..'हनी ट्रॅप' च्या माध्यमातून राज्याची महत्त्वाची कागदपत्रे 'अँटी सोशल मुव्हमेंट' च्या हाती चालली आहेत. मला कुणाचेही चारित्र्यहनन करायचे नाही. मात्र, या सगळ्याबाबत सरकार गंभीर नाही. साधे निवेदनही द्यायला तयार नाही. त्यामुळे अध्यक्षांनी याबाबत निर्देश द्यावेत, अशी विनंती त्यांनी केली. राज्यातील ७२ हून अधिक अधिकारी, काही मंत्री 'हनी ट्रॅप' च्या जाळ्यात अडकले आहेत. अशा मंडळींना हाताशी धरले जात असून गोपनीय माहिती गोळा केली जात आहे. तसेच काही अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करण्यात आले असून त्यांनी आत्महत्येसारखा टोकाचा विचार केला. पण, सरकार यावर काही बोलायला तयार नाही. पटोले यांचे हे उद्गार पूर्ण सभागृह हादरवून टाकणारे होते, हे नक्की !

### चक्क ७२ वरिष्ठ अधिकारी अडकले !

दरम्यान, या प्रकरणांमध्ये आजी-माजी मंत्री जाळ्यात अडकल्याचे समोर येत आहे. ही प्रकरणे निव्वळ 'हनी ट्रॅप' ची आहेत की अधिकाऱ्यांच्या रासलीला आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, यामुळे नाशिकच्या राजकीय वर्तुळात प्रचंड उत्सुकता निर्माण केली आहे. कारण या प्रकरणाचा गौप्यस्फोट नाशिक मध्ये करण्यात आला आहे. त्यात,नाशिकमधील एका बड्या अधिकाऱ्याचाही समावेश असल्याची चर्चा आहे. हा प्रकार नाशिकमधील एका पंचतारांकित सुविधा असलेल्या हॉटेलमध्ये घडल्याचे बोलले जात आहे.

### महिलेची तक्रार महत्त्वाची..

नाशिकच्या मुंबई नाका पोलिस ठाण्यात एका महिलेने तक्रार दाखल केल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अधिकाऱ्यांचे आणि नेत्यांचे आक्षेपार्ह व्हीडिओ असल्यामुळे कोणीही अधिकारी किंवा नेता या ट्रॅपबद्दल उघडपणे समोर येण्यास तयार नाही. त्यामुळे हे संपूर्ण प्रकरण सध्या गुलदस्त्यात आहे. त्यातील अधिकाऱ्यांची नावे काय ही उत्सुकता मात्र त्यामुळे शिगेला पोहोचली आहे.

### नाशिक, मुंबई, पुणे आणि...

या प्रकरणामुळे नाशिकसह मुंबई आणि पुणे येथील बड्या अधिकाऱ्यांचा आणि नेत्यांचा सहभाग असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. एका बड्या नेत्याने केलेल्या या गौप्यस्फोटामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. या 'हनी ट्रॅप' मध्ये नेमके कोणते अधिकारी किंवा मंत्री अडकले आहेत, याची चर्चा सुरू आहे पण हे प्रकरण केवळ वैयक्तिक संबंधांपुरते मर्यादित आहे की यामागे काही मोठे षडयंत्र आहे, याचाही शोध घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप?

या गौप्यस्फोटामुळे नाशिकपासून सुरू झालेली ही चर्चा आता राज्यभर पोहचण्याची शक्यता आहे. ज्यामुळे आगामी काळात महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप होईल, असे बोलले जात असून या प्रकरणाचे सत्य कधी समोर येते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. अर्थात् या प्रकरणात बडी धेंडे अडकली असल्यामुळे तपासामध्ये मोठे अडथळे किंवा दबाव येण्याची शक्यताही सध्या नाकारता येत नाही !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तोडण्याचे नाही जगाशी जोडण्याचे काम सुरु

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरेंना टोला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**मुंबई महापालिकेची सुमारे २०-२५ वर्षे सत्ता सांभाळणाऱ्यांच्या कानावर मराठीचा आक्रोश कधी पडला नाही का, आता मराठी माणसासाठी गळे काढणाऱ्यांनीच अमराठी कंत्राटदार, विकासकांसाठी मित्रांच्या माध्यमातून स्व:ताचे भले करुन घेतले. त्यामुळे आमच्याकडे बोटे दाखविण्यापूर्वी मराठी माणूस कुणामुळे मुंबईबाहेर फेकला गेला याचे आधी आत्मपरिक्षण करा टोला लगावतानाच मुंबईतील तोडण्याचे नाही तर जगाशी जोडण्याचे काम सरकार करीत असल्याचा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी केला.**



विरोधी पक्षाच्या वतीने राज्यातील नागरी प्रश्न, घरांचे प्रश्न तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामधील समस्यांबाबत उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेला उत्तर देताना शिंदे यांनी आपल्या तासभराच्या भाषणात मुंबईतील विकासकामांचा पाढा वाचत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले.मुंबई महानगरातील सर्वसामान्यांचे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासूनचे अडथळे दूर करीत मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसांना परत आणण्याचे काम करत आहोत. सरकारने गेल्या अडीच तीन वर्षात केलेल्या प्रयत्नांमुळे मुंबईतील नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल होईल. नगरविकास आणि गृहनिर्माण विभागातील आवश्यक त्या सुधारणांमुळे रखडलेले पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होतील तसेच झोपडपट्टीमुक्त मुंबईच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे शिंदे यांनी सांगितले.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सरकारने नव्हे तर न्यायालयाच्या आदेशामुळे लांबल्या असून आता निवडणूक प्रक्रिया सुरु झाली आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार या निवडणुका पार पडतील असे सांगून शिंदे म्हणाले, मुंबईत मराठी माणसासाठी गळे काढणाऱ्यांनी मुंबई बाहेर मराठी माणूस कोणामुळे फेकला गेला याचे आत्मपरिक्षण करावे. अमराठी ठेकेदार कंत्राटदारांकडून कोणी कोट्यवधी रुपयांची माया गोळा केली याचा लेखाजोखा आपल्याकडे आहे. तसेच पर्यावरणाचे रक्षण बोलून नाही तर करुन दाखववे लागते. मतदानाच्या आधी मी आणि तू आणि निवडणुकीनंतर कोण रे तू अशी आमची भूमिका नसल्याचा टोलाही त्यांनी ठाकरे यांना लगावला.मुंबईसाठी सर्वाधिक काम महायुती सरकारच्या काळात झाली आहेत. ही कामं मुंबईकरांच्या जीवनात आमूलाग्र बदल करणारी आहेत. देशाच्या स्वातंत्र्यानंतर मुंबईचा सर्वात मोठा विकास आम्ही करतोय. मुंबईचा सर्वार्थाने कायापालट केला जात असल्याचे सांगताना, वरळीच्या बीडीडी चाळीतील ५५६ सदनिकांचे वाटप १५ ऑगस्टपर्यंत करण्याची घोषणा शिंदे यांनी केली. रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देताना, मोतीलाल नगर गोरेगाव, जीटीपी नगर येथे समूह विकास प्रकल्पासाठी विकासकाची नेमणूक करण्यात आली आहे. यामुळे ४९०० रहिवाशांना घरे मिळणार आहेत. कामाठीपुरा अभ्युदयनगर इथल्या समुह विकासासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून सप्टेंबर २०२५पर्यंत ती पूर्ण होईल. ११ हजार ४११ भाडेकरूंना पुनर्विकासाचा लाभ होणार आहे. आदर्शनगर वरळी आणि वांद्रे रिक्लेमेशन येथे क्लस्टरचा लाभ २०१० रहिवाशांना होणार आहे.

### 13 हजार गिरणी कामगारांना घरे

त्याचीही निविदा प्रक्रिया सुरू आहे. वरळी नायगाव आणि ना.म. जोशी मार्ग येथे बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प सुरू आहे. त्यामध्ये एकूण १५ हजार ६०० भाडेकरूंचे पुनर्वसन होणार आहे. त्यापैकी वरळीमध्ये ५५६ सदनिकांचे वाटप १५ ऑगस्टपर्यंत करणार आहोत. एकूण २५ टक्के सदनिकांचे वाटप डिसेंबर २०२५ पर्यंत करण्याचे नियोजन असल्याचे शिंदे यांनी सांगितले.गिरणी कामगारांचे सर्वेक्षण करण्यात आले असून १ लाख ७४ हजार १७२ गिरणी कामगारांची नोंद झाली. आत्तापर्यंत १३ हजार १६१ गिरणी कामगारांना घरे दिली आहेत. गिरणी कामगारांना परवडणारी घरे योजनेतून घरे उपलब्ध करून देणार आहोत. त्यासाठी हौसिंग स्टॉकही वाढवला जाईल. त्यासाठी नियमात बदलही केले जातील,अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

# स्वच्छता सर्वेक्षणात महाराष्ट्राला १० पुरस्कार

## देशात यंदा अहमदाबादने 'सर्वात स्वच्छ शहर' असा मान पटकावला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**देशातील स्वच्छ शहरांच्या विशेष 'सुपरलीग' श्रेणीत इंदूरने बाजी मारली असली तरी, १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये देशात यंदा अहमदाबादने 'सर्वात स्वच्छ शहर' असा मान पटकावला. महाराष्ट्राने स्वच्छता सर्वेक्षणात १० राष्ट्रीय पुरस्कार मिळवून देशात दबदबा कायम राखला. तीन ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्र सर्वाधिक स्वच्छ गणले गेले.**



केंद्राच्या नागरी विकास मंत्रालयाच्या वतीने दरवर्षी देशभर स्वच्छता सर्वेक्षण केले जाते. २०२४-२५ च्या सर्वेक्षणातील मानांकित शहरांचा गुरुवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. यंदा 'सुपर स्वच्छ लीग' या नव्या श्रेणीचा समावेश करण्यात आला, त्याचबरोबर स्वच्छ शहरांची श्रेणीही कायम ठेवण्यात आली. नव्या श्रेणीमुळे इंदूर शहराला सर्वात स्वच्छ शहराचा मान 'सुपर स्वच्छ लीग' या श्रेणीतून देण्यात आला व देशातील सर्वात स्वच्छ शहरांमध्ये हा मान अहमदाबादला मिळाला. देशातील स्वच्छ शहरांच्या श्रेणीत ३ ते १० लाखांच्या लोकसंख्येच्या शहरांमध्ये मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्राने सर्वाधिक स्वच्छ शहराचा मान पटकावला. ५० हजार ते ३ लाख लोकसंख्येच्या शहरांमध्ये सातारा जिल्ह्यातील कराड दुसऱ्या क्रमांकाचे स्वच्छ शहर ठरले. उदयोन्मुख स्वच्छ शहरांच्या श्रेणीमध्ये महाराष्ट्रातून पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्राचा समावेश करण्यात आला.देशभर स्वच्छता सर्वेक्षण केले जाते. २०२४-२५ च्या सर्वेक्षणातील मानांकित शहरांचा गुरुवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. यंदा 'सुपर स्वच्छ लीग' या नव्या श्रेणीचा समावेश करण्यात आला.

### पिंपरी-चिंचवडचा समावेश

, त्याचबरोबर स्वच्छ शहरांची श्रेणीही कायम ठेवण्यात आली. नव्या श्रेणीमुळे इंदूर शहराला सर्वात स्वच्छ शहराचा मान 'सुपर स्वच्छ लीग' या श्रेणीतून देण्यात आला व देशातील सर्वात स्वच्छ शहरांमध्ये हा मान अहमदाबादला मिळाला.देशातील स्वच्छ शहरांच्या श्रेणीत ३ ते १० लाखांच्या लोकसंख्येच्या शहरांमध्ये मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्राने सर्वाधिक स्वच्छ शहराचा मान पटकावला. ५० हजार ते ३ लाख लोकसंख्येच्या शहरांमध्ये सातारा जिल्ह्यातील कराड दुसऱ्या क्रमांकाचे स्वच्छ शहर ठरले. उदयोन्मुख स्वच्छ शहरांच्या श्रेणीमध्ये महाराष्ट्रातून पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्राचा समावेश करण्यात आला.देशातील स्वच्छ शहरांच्या विशेष 'सुपरलीग' श्रेणीत इंदूरने बाजी मारली असली तरी, १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये देशात यंदा अहमदाबादने 'सर्वात स्वच्छ शहर' असा मान पटकावला.

# भारतातील सर्वात स्वच्छ शहर इंदूर!

## केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणात गुजरातमधील सुरत दुसऱ्या क्रमांकावर

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**इंदूरने सलग आठव्यांदा भारतातील सर्वात स्वच्छ शहराचा किताब पटकावला आहे. खरं तर इंदूरने सलग आठवेळा भारतातील सर्वात स्वच्छ शहराचा दर्जा कायम ठेवल्यामुळे तेथील प्रशासनाचं कौतुक करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते गुरुवारी (१७ जुलै २०२५) स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ या वर्षासाठीच्या पुरस्कारांचं वितरण कपण्यात आलं आहे. यावेळी स्वच्छ सर्वेक्षण अभियानात नव्याने समाविष्ट केलेल्या सुपर स्वच्छ लीग कॅटेगरीत इंदूरने बाजी मारत इंदूरला सर्वात स्वच्छ शहर म्हणून घोषित करण्यात आलं आहे.**



इंदूर सर्वात स्वच्छ शहर म्हणून घोषित करण्यात आलं आहे. केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणात गुजरातमधील सुरत दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर महाराष्ट्रातील नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर आंध्र प्रदेशातील विजयवाडाचा क्रमांक लागतो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ चे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. तसेच या वर्षी नोएडा, नवी दिल्ली महानगरपालिका आणि महाराष्ट्रातील विटा व पाचगणीचाही समावेश आहे. ही अनुक्रमे तीन शहरे १० लाख लोकसंख्या श्रेणी, ५० हजार ते ३ लाख लोकसंख्या, २० हजार ते ५० हजार लोकसंख्या आणि २० हजारांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या श्रेणीतील शहरांमध्ये सर्वात स्वच्छ शहरे ठरली आहेत. दरम्यान, हा स्वच्छ शहराचा किताब २०१६ पासून दरवर्षी केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाद्वारे केंद्राच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत आयोजित केला जातो.केंद्र शासनातर्फे राबविण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४ या राष्ट्रीय स्वच्छता स्पर्धेमध्ये पिंपरी-चिंचवड शहराने देशात सातवा क्रमांक पटकावला आहे. तर, राज्यात पहिला क्रमांक आला आहे. गतवर्षी पिंपरी-चिंचवड शहराचा देशात १३ वा तर राज्यात तिसरा क्रमांक आला होता.दरम्यान, प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे की, हे पुरस्कार १० सुस्पष्ट पॅरामीटर्सवर आधारित होते. त्यामध्ये ५४ निर्देशक आहेत, जे शहरांमधील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाचे संपूर्ण दृश्य देतात. पुरस्कारांमध्ये सार्वजनिक सहभागासह १४ कोटी लोकांना प्रत्यक्ष संवाद, स्वच्छता ॲप, MYGOV आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे सहभागी करून घेण्यात आलं होतं. "सुपर लीग" श्रेणी ही एक नवीन श्रेणी आहे. या श्रेणीत गेल्या तीन वर्षांत किमान एकदा तरी पहिल्या तीनमध्ये स्थान मिळवलेली आणि या वर्षात त्यांच्या संबंधित लोकसंख्येच्या टॉप २० टक्के श्रेणीत राहिलेली शहरे समाविष्ट आहेत.दरम्यान, दहा लाख लोकसंख्येच्या श्रेणीत इंदूर सर्वात स्वच्छ शहर म्हणून घोषित करण्यात आलं आहे. केंद्र सरकारच्या वार्षिक स्वच्छता सर्वेक्षणात गुजरातमधील सुरत दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर महाराष्ट्रातील नवी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज स्वच्छ प्रदान करण्यात आले आहेत.या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.तसेच या वर्षी नोएडा, नवी दिल्ली महानगरपालिका आणि महाराष्ट्रातील विटा व पाचगणीचाही समावेश आहे. ही अनुक्रमे तीन शहरे १० लाख लोकसंख्या श्रेणी, ५० हजार ते ३ लाख लोकसंख्या, २० हजार ते ५० हजार लोकसंख्या आणि २० हजारांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या श्रेणीतील शहरांमध्ये सर्वात स्वच्छ शहरे ठरली आहेत.

### पिंपरी-चिंचवड देशात सातवा क्रमांक

दरम्यान, हा स्वच्छ शहराचा किताब २०१६ पासून दरवर्षी केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाद्वारे केंद्राच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत आयोजित केला जातो.केंद्र शासनातर्फे राबविण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४ या राष्ट्रीय स्वच्छता स्पर्धेमध्ये पिंपरी-चिंचवड शहराने देशात सातवा क्रमांक पटकावला आहे. तर, राज्यात पहिला क्रमांक आला आहे. गतवर्षी पिंपरी-चिंचवड शहराचा देशात १३ वा तर राज्यात तिसरा क्रमांक आला होता.दरम्यान, प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे की, हे पुरस्कार १० सुस्पष्ट पॅरामीटर्सवर आधारित होते. त्यामध्ये ५४ निर्देशक आहेत, जे शहरांमधील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाचे संपूर्ण दृश्य देतात. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे सहभागी करून घेण्यात आलं होतं. "सुपर लीग" श्रेणी ही एक नवीन श्रेणी आहे.

# इराकच्या शॉपिंग मॉलमध्ये भीषण आग!

## सोशल मीडियावर इराकच्या आगीचे व्हिडीओ व्हायरल

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**इराकच्या अल कुट या शहरातल्या एका शॉपिंग मॉलला लागलेल्या आगीत ६० जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर ११ जण अद्याप बेपत्ता आहेत आणि त्यांचा शोध घेतला जातो आहे. रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार आगीवर नियंत्रण आणण्यासाठी अजूनही प्रयत्न सुरु आहेत. पाच मजल्यांच्या या मॉलला आग लागल्याचं व्हायरल व्हिडीओंमध्ये दिसतं आहे.**



सोशल मीडियावर इराकमधल्या शॉपिंग मॉलला लागलेल्या आगीचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. पाच मजली इमारतीला आग लागली असून या ठिकाणी आगीचे बंब आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करत आहेत. रॉयटर्सच्या वृत्तानुसार ६० जणांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. ६० पैकी ५९ मृतदेहांची ओळख पटली आहे. एका मृतदेहाचा अक्षरशः कोळसा झाला आहे त्यामुळे या मृतदेहाची ओळख पटलेली नाही. धमक्या मिळत आहेत.न्यायालयाने त्यांना परिसरातील पोलिसांकडे जाण्याची परवानगी दिली.इराकच्या अल-कुट या शहरातील मॉलला भीषण आग लागली. या आगीत ६० जणांचा मृत्यू.इराकच्या या मॉलला आग कुठल्या कारणांमुळे लागली हे अजून स्पष्ट झालेलं नाही. ४८ तासांत तपासाचे निष्कर्ष जाहीर केले जाण्याची चिन्हं आहेत. मॉलच्या मालकाविरोधात आणि अग्नि सुरक्षा यंत्रणांविरोधात कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आली आहे.या घटनेनंतर वासित प्रांत प्रशासनाने तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार मॉलला आग लागल्यानंतर आरडाओरडा आणि किंकाळ्या यांचे आवाज येत होते. तसंच आगीच्या भीतीने अनेक लोक सैरावैरा पळत होते. या आगीत ६० जणांचा मृत्यू झाला आहे.कमधल्या शॉपिंग मॉलला लागलेल्या आगीचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. असून या ठिकाणी आगीचे बंब आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करत आहेत.

### प्रत्यक्षदर्शींनी काय सांगितलं?

रॉयटर्सच्या वृत्तानुसार ६० जणांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. ६० पैकी ५९ मृतदेहांची ओळख पटली आहे. एका मृतदेहाचा अक्षरशः कोळसा झाला आहे त्यामुळे या मृतदेहाची ओळख पटलेली नाही.धमक्या मिळत आहेत. न्यायालयाने त्यांना परिसरातील पोलिसांकडे जाण्याची परवानगी दिली.इराकच्या अल-कुट या शहरातील मॉलला भीषण आग लागली. या आगीत ६० जणांचा मृत्यू.इराकच्या या मॉलला आग कुठल्या कारणांमुळे लागली हे अजून स्पष्ट झालेलं नाही. ४८ तासांत तपासाचे निष्कर्ष जाहीर केले जाण्याची चिन्हं आहेत. मॉलच्या मालकाविरोधात आणि अग्नि सुरक्षा यंत्रणांविरोधात कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आली आहे.या घटनेनंतर वासित प्रांत प्रशासनाने तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे.

## राजामौलींनी केलं कौतुक

जिनिलीया देशमुख बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. नुकतीच ती आमिर खानच्या 'सितारे जमीन पर'मधून झळकली. अशातच आता अभिनेत्रीने तिच्या आगामी दाक्षिणात्य चित्रपटाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यावेळी प्रसिद्ध दाक्षिणात्य दिग्दर्शक एसएस राजामौली यांनी तिचं कौतुक केल्याचं पाहायला मिळालं. जिनिलीया 'ज्युनिअर' या दाक्षिणात्य चित्रपटातून झळकणार आहे. हा चित्रपट १८ जुलैला प्रदर्शित होणार आहे. यामध्ये जिनिलीयासह दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला, अभिनेते राव रमेश, आर. रवीचंद्रन हे कलाकार झळकणार आहेत. राधाकृष्ण रेड्डी यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. जिनिलीया या चित्रपटातून तेलुगू चित्रपटसृष्टीत पुनरागमन करत आहे.ज्युनिअर' चित्रपटाच्या एका कार्यक्रमाला दिग्दर्शक, निर्माते राजामौलींनीही हजेरी लावली होती. त्यावेळी त्यांनी जिनिलीयाच्या तेलुगू इंडस्ट्रीतील पुनरागमनाबद्दल त्यांची प्रतिक्रिया दिली आहे. 'पिंकव्हिला साऊथ'च्या वृत्तानुसार, राजामौली जिनिलीयाला म्हणाले, "किती वर्षे झाले पण तू अजूनही तशीच दिसत आहेस. मी सिनेमॅटोग्राफर सेंथिलला विचारलं होतं की, आपल्याला नवीन जिनिलिया दिसेल का तर तोसुद्धा म्हणाला हो नक्कीच. त्यामुळे मी आतुरतेने तुझी वाट बघत आहे".जिनिलीया यावर म्हणाली, "तुम्ही खूप चांगले आहात सर माझ्यासाठी तुमचे हे शब्द फार महत्त्वाचे आहेत". जिनिलीया शेवटचं 'ना इश्तम' या तेलुगू चित्रपटातून झळकली होती. त्यानंतर आता ती 'ज्युनिअर' चित्रपटातून तेलुगू इंडस्ट्रीत पुनरागमन करत आहे. जिनिलीयाने आजवर 'बॉईज', 'सचिन', 'हॅपी', 'बोम्मारिल्लू', 'संतोष सुब्रमण्यम', 'उरुमी' यांसारख्या अनेक दाक्षिणात्य चित्रपटांतून काम केलं आहे.

## मूल झाल्यानंतर काम न मिळण्याची भीती होती



अनेकदा अभिनेत्रींना मूल झाल्यानंतर काम मिळणार नाही याची भीती असते. परंतु, अशा काही अभिनेत्री आहेत, ज्यांनी प्रेग्नन्सीनंतरही इंडस्ट्रीत कमबॅक केलं आहे. असंच एका मराठमोळ्या अभिनेत्रीलाही मूल झाल्यानंतर काम मिळणार नाही याची भीती होती; पण ती आजही मालिका, रंगभूमी या माध्यमांतून प्रेक्षकांचं मनोरंजन करीत आहे. याबाबत तिने एका मुलाखतीमधून सांगितलं होतं. मूल झाल्यानंतर काम मिळणार नाही याची भीती होती, असं वक्तव्य लोकप्रिय अभिनेत्री अदिती सारंगधर हिनं केलेलं. अदिती सारंगधर हिनं 'राजश्री मराठी'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये याबाबत सांगितलं होतं. त्यामध्ये तिला "तुला मूल झाल्यानंतर काम न मिळण्याची भीती होती का," असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर अदितीनं, "हो, मला मूल झाल्यानंतर काम मिळणार नाही याची भीती होती", असं उत्तर दिलेलं.अदिती म्हणालेली, "गरोदर असताना मला 'लक्ष्य' ही मालिका सोडावी लागली होती. त्याबरोबर 'प्रपोजल' हे नाटकसुद्धा बंद करावं लागलं. गरोदर असल्यामुळे हातातलं इतकं चांगलं काम थांबवावं लागलं. करिअरच्या शिखरावर असताना ब्रेक घ्यावा.

## तेजश्री प्रधानची झाली एक्झिट

'स्टार प्रवाह' वाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'प्रेमाची गोष्ट'मध्ये मोठा बदल झाला आहे. 'प्रेमाची गोष्ट'मध्ये प्रमुख भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री तेजश्री प्रधानने अचानक मालिकेला रामराम केला आहे. त्यामुळे सध्या तेजश्री चाहत्यांसह 'प्रेमाची गोष्ट' मालिकेच्या प्रेक्षकांमध्ये नाराजीचं वातावरण पसरलं आहे. 'तू मालिका सोडू नकोस', 'मालिका सोडण्यामागचं कारण काय?', अशा प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटल्या आहेत. आता नवी मुक्ता साकारणाऱ्या अभिनेत्रीने चित्रीकरणाला सुरुवात केली आहे.'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्री प्रधानची जागा अभिनेत्री स्वरदा ठिगळेने घेतली आहे. लवकरच स्वरदा मुक्ताच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. स्वरदाने 'प्रेमाची गोष्ट' मालिकेच्या चित्रीकरणाला नुकतीच सुरुवात केली आहे. तिने इन्स्टाग्रामवर स्क्रिप्टचा फोटो शेअर केला आहे. "नवीन वर्षाची नवी सुरुवात", असं तिने त्या फोटोवर लिहिलं होतं. स्वरदाची ही इन्स्टाग्राम

## ॲक्शन नाही अन् खलनायकही नाही

नेटफ्लिक्सवर या आठवड्यात बरेच चित्रपट, सीरिज रिलीज झाल्या आहेत. सध्या एक बॉलीवूड चित्रपट नेटफ्लिक्सवर पहिल्या क्रमांकावर ट्रेंड करतोय. १५५ मिनिटांचा हा चित्रपट सिनेमागृहांमध्ये नाही, तर थेट ओटीटीवर रिलीज करण्यात आला होता. या चित्रपटात एकही ॲक्शन सीन नाही, इतकंच काय तर यात कोणी खलनायकही नाही. एक साधीशी लव्ह स्टोरी असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना फारच भावला आहे. ओटीटीवरील ट्रेंडिंग चित्रपटांची यादी दर आठवड्यात बदलत असते. या आठवड्यात रिलीज झालेल्या एका चित्रपटाने टॉप १० ट्रेंडिंग सिनेमांच्या यादीत पहिलं स्थान मिळवलं आहे. या चित्रपटाचं नाव आहे 'आप जैसा कोई'.'आप जैसा कोई' हा एक हिंदी रोमँटिक-ड्रामा चित्रपट आहे. हा चित्रपट ११ जानेवारी रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला. यामध्ये आर. माधवन व फातिमा सना शेख या दोघांनी मुख्य भूमिका साकारल्या आहेत. तसेच आएशा रजा मिश्रा, नमित दास व मनीष चौधरी यांनीही या सिनेमात काम केलं आहे.या चित्रपटाची कथा झारखंडमधील जमशेदपूरला राहणारा श्रीरेणू त्रिपाठी (आर. माधवन) व कोलकात्यात राहणाऱ्या मधु बोस (फातिमा सना शेख) यांच्याभोवती फिरते.

## अखेर अंकिताच्या घरी 'ती' आलीच!



'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे अंकिता वालावलकर महाराष्ट्राच्या घराघरांत लोकप्रिय झाली. गेल्या काही महिन्यांपासून ही 'कोकण हार्टेड गर्ल' तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. येत्या काही दिवसात अंकिता संगीत दिग्दर्शक कुणाल भगतशी लग्नगाठ बांधणार आहे. यापूर्वी 'कोकण हार्टेड गर्ल'ने तिच्या चाहत्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे. ती म्हणजे अंकिताच्या घरी नव्या गाडीचं आगमन झालेलं आहे.अंकिताने सोशल मीडियावर 'ती येतेय', 'ती आलीये... वाट बघतेय' अशा पोस्ट शेअर तिच्या सगळ्या चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण केली होती. अंकिताने नेमकं काय सरप्राइज देणार याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत होते. अखेर नव्या गाडीची पहिली झलक तिने फोटो शेअर करत सर्वांना दाखवली आहे. अंकिता वालावलकरने ऑडी ही आलिशान गाडी खरेदी केली आहे. गाडीचा पहिला फोटो शेअर करत याला 'कोकण हार्टेड गर्ल'ने 'आवडी आली' असं कॅप्शन दिलं आहे.गाडी खरेदी करताना अंकितासह तिचा होणारा नवरा कुणाल देखील उपस्थित होता. काही दिवसांपूर्वीच तिने आपली पहिली कार विकली होती. ही कार विकल्यावर अंकिताने, दुसरी गाडी घ्यायचा विचार होता म्हणून जुनी गाडी विकली. सध्या मी दोन-तीन गाड्यांमध्ये कन्फ्युज असल्याचं सांगितलं होतं. त्यामुळे अंकिता लवकरच नवीन गाडी खरेदी करेल याची हिंट सर्वांना आधीच मिळाली होती. अखेर नव्या गाडीचा फोटो शेअर करत 'कोकण हार्टेड गर्ल'ने ही आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांत अनेक सेलिब्रिटींनी नवीन गाड्या खरेदी केल्याचं पाहायला मिळालं आहे. यात आता अंकिताचं नाव देखील जोडलं गेलं आहे. अंकिताच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर तिला प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर म्हणून ओळखलं जातं. 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे ती घराघरांत लोकप्रिय झाली. या सीझनच्या महाअंतिम फेरीपर्यंत ती पोहोचली होती.आता वैयक्तिक आयुष्यात लवकरच कोकण हार्टेड गर्ल विवाहबंधनात अडकणार आहे. सध्या नव्या गाडीसाठी सगळ्या चाहत्यांनी अंकितावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे अंकिता वालावलकर महाराष्ट्राच्या घराघरांत लोकप्रिय झाली. गेल्या काही महिन्यांपासून ही 'कोकण हार्टेड गर्ल' तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. येत्या काही दिवसात अंकिता संगीत दिग्दर्शक कुणाल भगतशी लग्नगाठ बांधणार आहे. यापूर्वी 'कोकण हार्टेड गर्ल'ने तिच्या चाहत्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे. ती म्हणजे अंकिताच्या घरी नव्या गाडीचं आगमन झालेलं आहे. अंकिताने सोशल मीडियावर 'ती येतेय', 'ती आलीये... वाट बघतेय' अशा पोस्ट शेअर तिच्या सगळ्या चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण केली.

# बुमराला खेळविण्याकडे कल!

## इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्याबाबत दोएशहातेचे संकेत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील आव्हान टिकविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या भारतीय संघाचा मँचेस्टर येथे होणाऱ्या चौथ्या सामन्यातही तारांकित वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराला खेळविण्याकडे कल आहे. मात्र, अंतिम निर्णय सामन्याच्या पूर्वसंध्येलाच घेतला जाईल, असे भारतीय संघाचा साहाय्यक प्रशिक्षक रायन टेन दोएशहाते म्हणाला.**



पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय संघ सध्या १-२ असा पिछाडीवर असून चौथा सामना २३ जुलैपासून मँचेस्टर येथे खेळवला जाणार आहे. त्यापूर्वी भारतीय संघाने गुरुवारी बेकनहॅम येथे सराव केला. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना दोएशहातेने भारतीय संघाच्या योजनेची माहिती दिली.‘बुमराबाबतचा निर्णय आम्ही मँचेस्टरला पोहोचल्यानंतरच घेऊ. उर्वरित दोनपैकी एकाच सामन्यात बुमरा खेळणार असल्याचे आम्हाला ठाऊक आहे. मात्र, आता मालिकेतील आव्हान टिकविणे महत्त्वाचे असल्याने या कसोटीत बुमराला खेळविण्याकडे आमचा कल आहे. मात्र, आम्हाला विविध गोष्टींबाबत विचार करावा लागेल. सामना किती दिवस चालणार? विजय मिळविण्याच्या दृष्टीने सर्वोत्तम पर्याय काय? तसेच ओव्हल येथे होणाऱ्या अखेरच्या कसोटीत कोणाला खेळविणे अधिक योग्य ठरेल? या सगळ्याचा विचार करूनच आम्हाला निर्णय घ्यावा लागेल,” असे दोएशहातेने सांगितले.तिसऱ्या कसोटीत यष्टिरक्षक ऋषभ पंतच्या बोटाला दुखापत झाली. त्यामुळे त्याला पहिल्या डावातील उत्तरार्ध, तसेच दुसऱ्या डावात यष्टिरक्षण करता आले नाही. त्याने दोन्ही डावांत फलंदाजी केली, पण त्याला चेंडू मारताना अडचण येत होती. मात्र, मँचेस्टर कसोटीपूर्वी तो तंदुरुस्त होणे अपेक्षित असल्याचे दोएशहातेने सांगितले. परंतु तो यष्टिरक्षण करणार की नाही, याचे स्पष्ट उत्तर देणे त्याने टाळले. “तिसऱ्या कसोटीत फलंदाजी करतानाही पंतला वेदना झाल्या. मात्र, आता विश्रांतीमुळे त्याची दुखापत बरी होत आहे. यष्टिरक्षण हा या प्रक्रियेचा अखेरचा भाग आहे. डावाच्या मध्यातच पुन्हा यष्टिरक्षक बदलावा लागेल अशी स्थिती आम्हाला ओढवून घ्यायची नाही.

आम्ही पंतला अधिकाधिक वेळ देण्याचा प्रयत्न करत आहोत. मँचेस्टर येथे होणाऱ्या पहिल्या सराव सत्रात तो सहभागी होईल अशी आम्हाला आशा आहे,” असे दोएशहातेने नमूद केले. काही वर्षांपूर्वी कसोटी संघातून बाहेर गेल्यानंतर देशांतर्गत स्पर्धेतही संधी न मिळाल्याने निराश झालेल्या करुण नायरने ‘प्रिय क्रिकेट, मला आणखी एक संधी दे,’ असे ‘ट्वीट’ केले होते. क्रिकेटने करुणला दुसरी संधी दिली, पण त्याचा योग्य वापर करून घेण्यात तो अपयशी ठरला. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांत मिळून एकही अर्धशतक करू न शकलेल्या ३३ वर्षीय करुणला आता चौथ्या सामन्यासाठी भारतीय संघातून डच्चू मिळण्याची दाट शक्यता आहे. इंग्लंडविरुद्धच्या सहाही डावांत चांगल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत रूपांतर करण्यात करुण चुकला. त्याला अनुक्रमे ०, २०, ३१, २६, ४०, १४ धावाच करता आल्या.

### मँचेस्टरला पोहोचल्यानंतर निर्णय

त्याने ‘ड्राइव्ह’चे काही नेत्रदीपक फटके मारले, पण खेळपट्टीच्या मध्यावरून अतिरिक्त उसळी घेणाऱ्या चेंडूंविरुद्ध तो वारंवार अडचणीत सापडताना दिसला.तिसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात तो ज्या प्रकारे बाद झाला, त्यामुळे त्याच्यावर बरीच टीका झाली. अशात करुणच्या जागी युवा साई सुदर्शनला संधी देण्याबाबत संघ व्यवस्थापन विचार करू शकेल.पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय संघ सध्या १-२ असा पिछाडीवर असून चौथा सामना २३ जुलैपासून मँचेस्टर येथे खेळवला जाणार आहे. त्यापूर्वी भारतीय संघाने गुरुवारी बेकनहॅम येथे सराव केला. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना दोएशहातेने भारतीय संघाच्या योजनेची माहिती दिली.‘बुमराबाबतचा निर्णय आम्ही मँचेस्टरला पोहोचल्यानंतरच घेऊ. उर्वरित दोनपैकी एकाच सामन्यात बुमरा खेळणार असल्याचे आम्हाला ठाऊक आहे. मात्र, आता मालिकेतील आव्हान टिकविणे महत्त्वाचे असल्याने या कसोटीत बुमराला खेळविण्याकडे आमचा कल आहे.

# प्रज्ञानंदची कार्लसनवर मात!

## ‘फ्रीस्टाइल’ बुद्धिबळ स्पर्धेच्या लास वेगास टप्प्यात उपांत्यपूर्व फेरीत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगज्जेत्या दोम्माराजू गुकेशकडून पारंपरिक आणि जलद प्रकारात पराभूत होणाऱ्या मॅग्नस कार्लसनवर आता भारताचा आणखी एक ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंदकडून पराभव पत्करण्याची नामुष्की ओढवली आहे. ‘फ्री-स्टाइल ग्रँडस्लॅम टूर’च्या लास वेगास टप्प्यात प्रज्ञानंदने विश्वातील सर्वोत्तम बुद्धिबळपटू अशी ख्याती असलेल्या कार्लसनवर अवघ्या ३९ चालींत सरशी साधत उपांत्यपूर्व फेरी गाठली.**




या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी प्रज्ञानंदने अप्रतिम कामगिरी करताना ‘विजेत्या’ खेळाडूंच्या गटात संयुक्त अग्रस्थान मिळवले. सात फेऱ्यांअंती प्रज्ञानंद, नोदिरबेक अब्दुसत्तोरोव आणि जावोखिर सिंदारोव यांचे समान ४.५ गुण होते. लेवॉन अरोनियन चार गुणांसह चौथ्या स्थानी राहिला. कार्लसनने स्पर्धेची सुरुवात सलग विजयांसह केली होती. मात्र, तिसऱ्या फेरीत प्रज्ञानंदविरुद्ध झालेल्या पराभवातून सावरणे कार्लसनला अवघड गेले. पुढील फेरीत त्याला अमेरिकेच्या वेस्ली सोकडूनही हार पत्करावी लागली.

### एरिगेसीचीही आगेकूच

त्यानंतर त्याला सलग दोन लढतींत बरोबरीवर समाधान मानावे लागले. अखेरच्या फेरीत विजय अनिवार्य असताना त्याने बिबिसारा असाउबायेवाला पराभूत केले. मात्र, त्यानंतरही त्याला ‘प्ले-ऑफ’मध्ये खेळावे लागले. यात कार्लसनने अरोनियन याच्याविरुद्ध दोनही डावांत हार पत्करली. त्यामुळे पहिल्या दिवसअखेरीस त्याला ‘पराभूत’ खेळाडूंच्या गटात स्थान मिळाले आणि तो जेतेपदाच्या शर्यतीतून पूर्णपणे बाहेर गेला.दुसऱ्या गटातून ग्रँडमास्टर अर्जुन एरिगेसीनेही उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले. अडखळत्या सुरुवातीनंतर एरिगेसीला सूर गवसला. त्याचे आणि अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाचे समान चार गुण झाले. हिकारू नाकामुराने उत्कृष्ट खेळ करताना सात फेऱ्यांत सहा गुण मिळवत गटात अग्रस्थान पटकावले. निराशाजनक ठरली. तो केवळ १.५ गुणांसह अखेरच्या स्थानी राहिला. आता उपांत्य फेरीत प्रज्ञानंदसमोर कारुआना, तर एरिगेसीसमोर अब्दुसत्तोरोवचे आव्हान असेल.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
। दि. 18 जुलै 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



ePaper
। शुक्रवार ।
। दि. 18 जुलै 2025।
स्मार्ट PCMC
महाईन्यूज
epaper.mahaenews.com


## कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांचे सभागृहात आश्वासन

# प्राधिकरणाच्या प्रॉपर्टी ‘फ्री होल्ड’ होणार!

### आ. महेश लांडगे यांची विधानसभेत लक्षवेधी; प्राधिकरण भागातील नागरिकांना दिलासा

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील प्रॉपर्टी “फ्री होल्ड” करण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे. सिडको आणि पीएमआरडीच्या हद्दीतील मिळकती ज्या प्रमाणे फ्री होल्ड करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला. त्याच धर्तीवर पीसीएमसीच्या कार्यक्षेत्रातील प्राधिकरणाच्या प्रॉपर्टी फ्री होल्ड करण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. महसूल व वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठवला आहे. त्याबाबत कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय होईल, असे आश्वासन कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी दिले.**




नवनगर प्राधिकरणाचे 2021 मध्ये PMRDA (पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) मध्ये विलिनीकरण झाल्यानंतर त्याच्या मालमत्तांचे विभाजन PCMC आणि PMRDA अशा दोन अस्थापनांमध्ये करण्यात आले. प्राधिकरणाच्या प्रॉपर्टी 40 वर्षांपूर्वी विकसित केल्या आहेत. त्या 99 वर्षांच्या भाडेपट्ट्याने वाटप केल्यामुळे त्याचा पुनर्विकास, वारस नोंदी आणि हस्तांतरण प्रक्रिया करताना मिळकतधारकांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे सदर प्रॉपर्टी फ्री होल्ड कराव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

दरम्यान, PMRDA कार्यक्षेत्रातील 11 हजार 293 सदनिका आणि 495 गाळेधारक यांच्या प्रॉपर्टी “फ्री होल्ड” करण्याचा निर्णय दि.11 ऑक्टोबर 2024 रोजी कॅबेनेट मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्याचा GR सुद्धा प्रसिद्ध झाला. त्यामुळे 11 हजार 293 सदनिका आणि 495 गाळेधारक यांना दिलासा मिळाला. उर्वरित, मिळकती पीसीएमसीच्या कार्यक्षेत्रात आहेत. त्यांबाबत निर्णय झालेला नाही. याबाबत आमदार लांडगे यांनी पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने राज्य सरकारचे लक्ष वेधले.

आमदार लांडगे यांनी 1. PCMC कार्यक्षेत्रातील PCNTDA च्या प्रॉपर्टी फ्री होल्ड करा. 2. नवनगर प्राधिकरणाच्या सुमारे साडेतीन हजार प्लॉटधारक “रेड झोन” बाहेर करावेत. 3. नवनगर प्राधिकरणाच्या वापरात नसलेल्या शासकीय इमारती पुनर्विकासाठी महापालिकेकडे हस्तांतरीत करा. या तीन प्रमुख मागण्या सरकारकडे केल्या. तसेच, कॅबिनेट मंत्रीमंडळाची बैठक घेवून प्रश्न मार्गी लावण्याचा आग्रह मंत्री महोदय यांच्याकडे धरला.

यावर, कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक उत्तर दिले. पीसीएमसीच्या कार्यक्षेत्रातील प्राधिकरणाच्या प्रॉपर्टी फ्री होल्ड करण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे. त्याबाबतचा प्रस्ताव महसूल आणि वित्त विभागाकडे आहे. त्यावर कॅबिनेटमध्ये चर्चा करुन सकारात्मक निर्णय घेतला जाईल. ‘रेड झोन’ बाधित प्राधिकरण हद्दीतील मिळकतधारकांना दिलासा देण्याबाबत आणि विनावापर इमारतीचा पुनर्विकास करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात येईल, असे आश्वासन सामंत यांनी सभागृहात दिले.

## पूर्णानगरमधील कचरा ‘डंम्पिंग ग्राउंड’ झाले चकाचक!

### पुण्यश्लोक राजमाता प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरूण पाडुळे यांचा विधायक पुढाकार!

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**प्रभाग क्र. 11 मधील पूर्णानगर परिसरातील नक्षत्र फेज 1 च्या मागील मोकळी जागा तसेच साई दीप अपार्टमेंट जवळील मोकळ्या जागा म्हणजे बेकायदेशीर कचरा ‘डंम्पिंग ग्राउंड’ बनले होते. त्यामुळे नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला. यावर पुण्यश्लोक राजमाता प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरुण पाडुळे यांचा विधायक पुढाकार घेतला आणि परिसर चकाचक करण्यात आला.**







नक्षत्र फेज 1 आणि साई दीप अपार्टमेंटजवळील मोकळ्या जागांची स्वच्छता मोहीम करावी. यासाठी स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्यानंतर अखेर सकारात्मक पावले उचलण्यात आली आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. राष्ट्रीय खेळाडू अरुण पाडुळे म्हणाले की, आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नक्षत्र फेज 1 आणि साई दीप अपार्टमेंटजवळील मोकळ्या जागांची स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यासाठी महापालिका प्रशासनाने सकारात्मक पुढाकार घेतला. या दोन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणात साफसफाई व स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षेचा आणि परिसराच्या सौंदर्यीकरणाचा विचार करून हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील मोकळे भूखंड डम्पिंग स्टेशन बनल्याचे दिसत आहेत. कचरा, बांधकामाचा राडारोडा, इलेक्ट्रॉनिक वेस्ट राजरोसपणे येथे फेकले जात असल्याचे निदर्शनास येत आहे. टाकणारे टाकून जात आहेत; मात्र त्याचा त्रास आसपास राहणाऱ्या नागरिकांना होत आहे. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांमध्ये जागृती करावी. कचरा टाकू नये... असे फलक संबंधित ठिकाणी लावावेत. यासह नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन अरुण पाडुळे यांनी केले आहे.

> “ पिंपरी-चिंचवड महापालिकेचा स्वच्छ सर्वेक्षणामध्ये देशात सातवा आणि राज्यात पहिला क्रमांक आला आहे. देश-राज्य पातळीवर स्वच्छतेबाबत चांगली कामगिरी करणाऱ्या शहराचे आपण नागरिक आहोत. त्यामुळे सार्वजनिक आणि मोकळ्या ठिकाणी कचरा फेकू नये. महापालिकेच्या आवाहनानुसार, कचऱ्याचे विलगीकरण आणि वर्गीकरण यासाठी नागरीकांनी पुढाकर घेतला पाहिजे. आपले शहर आपणच स्वच्छ ठेवले पाहिजे. आगामी काळात स्वच्छ आणि सुंदर पूर्णानगर यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वोतोपरी पुढाकार घेणार आहे.
>
> **–अरुण पाडुळे,** अध्यक्ष, पुण्यश्लोक राजमाता प्रतिष्ठान

## औद्यागिक मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते

# जीईसीचे दुबईमध्ये होणार उद्घाटन!

## पीसीयू व इतर संस्थांच्या वतीने ऑगस्ट महिन्यात जीईसीचे दुबई मध्ये आयोजन

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील प्रॉपर्टी "फ्री होल्ड" करण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे. सिडको आणि पीएमआरडीच्या हद्दीतील मिळकती ज्या प्रमाणे फ्री होल्ड करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला. त्याच धर्तीवर पीसीएमसीच्या कार्यक्षेत्रातील प्राधिकरणाच्या प्रॉपर्टी फ्री होल्ड करण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. महसूल व वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठवला आहे. त्याबाबत कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय होईल, असे आश्वासन कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी दिले.**




पिंपरी चिंचवड: आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षण क्षेत्रात अल्पावधीत उत्तुंग भरारी घेतलेल्या पिंपरी चिंचवड विद्यापीठ व इतर संस्थांच्या वतीने ऑगस्ट महिन्यामध्ये दुबई मध्ये ग्लोबल आंत्रप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्हचे (जीईसी) आयोजन करण्यात आले आहे.

दि.१६ ऑगस्ट रोजी हॉटेल कॉनरॉड, दुबई येथे महाराष्ट्राचे औद्यागिक विकास मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते जीईसीचे उद्घाटन होणार आहे. महाराष्ट्र आणि आखाती देशातील उद्योग, व्यवसायांना चालना मिळण्यासाठी, पिंपरी चिंचवड युनिर्व्हसिटी, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ, गर्जे मराठी ग्लोबल आणि सावा हेल्थकेअर लि. यांच्या संयुक्त विद्यमाने जीईसीचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १८ ऑगस्ट रोजी समारोप होणार आहे.

सावा हेल्थ केअर लि.चे चेअरमन विनोद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उद्योग विभागाच्या सहकार्यातून आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्लोबल आंत्रप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्हच्या माध्यमातून भारत आणि आखाती देशातील उद्योजकांना एकमेकांशी संवाद साधत औद्योगिक संकल्पनांचे आदान प्रदान करता येईल. त्यातून औद्योगिक विकासाला चालना मिळेल. तसेच उद्योग क्षेत्रातील विश्व पातळीवरील धोरणे, आर्थिक नियोजन या विषयी नवउद्योजकांना ज्येष्ठ व्यावसायिकांचे मार्गदर्शन मिळणार आहे अशी माहिती महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष आणि जीईसीचे समन्वयक सचिन ईटकर व पिंपरी चिंचवड युनिर्व्हसिटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीष देसाई, कॉमसेन्स टेक्नॉलॉजी चे चेअरमन सागर बाबर यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

पुण्यात गुरुवारी (दि. १७ जुलै) दुबई मध्ये होणाऱ्या ग्लोबल आंत्रप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्हचे माहितीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी डॉ. गिरीश देसाई, सचिन ईटकर, विनोद जाधव आणि सागर बाबर आदी उपस्थित होते.

उद्योजकता, गुंतवणूकदार, तंत्रज्ञान, किरकोळ विक्री, गुंतवणुकीच्या संधी, उद्योग क्षेत्रातील भविष्यातील वाटा, नवनवीन व्यवसाय संधी, नेटवर्किंग, उद्योग क्षेत्रासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, भविष्यातील आव्हाने या विविध विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. व्यावसायिक व उद्योजकांचा प्रेरणादायी प्रवास, त्यांच्या यशोगाथाही नवउद्योजकांना मुलाखतींद्वारे ऐकायला मिळणार आहेत. सहभागी उद्योजक हे दुबई, शारजा, अबुधाबी येथील फ्रि झोन्स, इनोव्हेशन सेंटर्स, तसेच डीपी वर्ल्ड जाफसा सेंटर येथे भेट देऊन तेथील प्रकल्पांची माहिती घेऊ शकतील.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, उद्योजक प्रतापराव पवार, संदीप वासलेकर, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे आणि सावा हेल्थकेअर लिमिटेड चे चेअरमन विनोद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या ग्लोबल आंत्रप्रेन्युअर्स कॉन्क्लेव्हचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे अध्यक्ष अतुल शिरोडकर, गर्जे मराठी ग्लोबलचे संस्थापक आनंद गानू, तसेच दुबई येथील उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्था आयोजनासाठी कार्यरत आहेत.




DNYANVARDHINI PRATISHTHAN'S
VIDYA VALLEY
NORTH POINT COLLEGE
Affiliated to SNDT Women's University

Key Features
- Scholarship according to Government norms
- Earn & Learn Schemes
- MOU with industries
- Qualified & Experienced staff

ADMISSIONS
OPEN ONLY FOR GIRLS
B.SC.-IT (120 INTAKE)

Contact Us
9422537623 / 9422537626

vinfo@vidyavalleynpcollege.edu.in
Plot No. 3, Shivtej Nagar, Chinchwad, Pune, Maharashtra, India - 411 019

## पिंपरी-चिंचवडमध्ये DP च्या विरोधात


# हरकती-सूचनांचा "पॉलिटिकल फार्स"!

### 6 वर्षांच्या चिमुरडीच्या नावावर हरकत! : "महाईन्यूज" च्या हाती लागले धक्कादायक पुरावे



**। पिंपरी- चिंचवड । महाईन्यूज । अविनाश आदक ।**

**पिंपरी-चिंचवड शहरासाठी तयार करण्यात आलेल्या प्रारुप विकास आराखड्यावरुन पॉलिटीकल फार्स केला जात आहे. याबाबत 'महाईन्यूज' ने सातत्याने प्रकाश टाकला आहे. आज त्यावर शिक्कामोर्तब होईल, असा पुरावाच महाईन्यूजच्या हाती सापडला. अवघ्या सहा वर्षांच्या मुलीच्या नावाने... जिला अद्याप डीपी म्हणजे काय याचे ज्ञान नाही... आकलन नाही... अशा मुलीच्या नावे लेख अर्ज आणि आधार कार्ड जोडून काही महाभागांनी डीपीबाबत हरकतींचा आकडा फुगवला आहे, असा धक्कादायक पुरावा समोर आला आहे.**




'महाईन्यूज'ने याआधीही या आराखड्याबाबत सुरू असलेल्या विषपेरणीविरोधात भूमिका घेतली होती. या "फेक नॅरेटिव्ह"च्या जाळ्यात अगदी आमदार शंकर जगताप असोत किंवा विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, उमा खापरे यासुद्धा अडकल्या. याबाबत आम्ही स्पष्ट भूमिका मांडली आणि वस्तुस्थिती पिंपरी-चिंचवडकरांसमोर ठेवली.

शहर विकास आराखड्याबाबत तब्बल 49 हजार नागरिकांनी हरकती-सूचना दाखल केल्या. यावरुन डीपी विरोधी भूमिका घेणाऱ्यांनी अगदी आनंदोत्सव साजरा केला. पण, खरी परिस्थिती वेगळी आहे. हकरती आणि सूचनांची छाननी झाली की, सत्य समोर येणार आहे. शहरामध्ये चुकीची आणि निराधार माहिती पसरवणे आणि त्याचा राजकीय फायदा करुन वातावरण निर्मिती करणे. यामुळे शहराचे हित साध्य करता येणार नाही.

"महाईन्यूज"च्या हाताला लागलेले पुरावे धक्कादायक आहेत. एका हरकतीच्या यादीत एका केवळ सहा वर्षांच्या बालिकेचे नाव असून, तिच्या वतीने कोणत्याही प्रौढानेही हरकत दिल्याचा ठोस पुरावा नाही! ही हरकत नकली असून, ती कुठून आणि कशी आली? हा खरा प्रश्न आहे. ही केवळ एक केस नाही — अशा अनेक संशयास्पद हरकतींचा समावेश यादीत असल्याची माहिती मिळत आहे.

#### शहराच्या नियोजनाची थट्टा

विकास आराखडा म्हणजे शहराच्या भविष्यासाठी आखलेली दिशा असते. या प्रक्रियेत पारदर्शकता, नागरिकांचा सहभाग आणि तांत्रिक अचूकता आवश्यक असते. मात्र, पिंपरी-चिंचवडमधील काही कथित समाजसेवक, राजकीय संधीसाधू आणि त्याला खत-पाणी घालणारे कथित पत्रपंडित यांनी थेट चुकीच्या महितीच्या आधारे अक्षरश: लोकांमध्ये संम्रभ निर्माण केला. लोकांना आंदोलन करण्यास भाग पाडले. डीपीच्या प्रक्रियेलाच चेष्टेचा विषय बनवल्याचे आता समोर येत आहे. दाखल हरकतींची संख्या जास्त कशी आहे? हे दाखवून, 'लोकांनी भरपूर प्रतिसाद दिला' असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. 35 लाख लोकसंख्या असलेल्या आणि 8 लाखाहून अधिक मिळकतीदार-करदाते असलेल्या या शहरात पुढील 40 वर्षांचा विचार करुन डीपी तयार केला जात आहे. त्यावर हरकती किती तर 49 हजार. म्हणजे 1.3 टक्के सुद्धा नाहीत. हा सर्व खटाटोप कशासाठी? तर महानगरपालिका निवडणूक तोंडावर आहे. सत्ताधाऱ्यांची प्रतिमा डीपीच्या आडून मलीन केली, तर राजकीय फायदा साधता येईल.

> **"महाईन्यूज" सातत्याने डीपीबाबत वस्तुनिष्ठ वृत्तांकन केले. डीपी कसा असावा किंवा त्यामध्ये काय नसावे? हा या शहरातील नागरिकांचा अधिकार आहे. पण, डीपी कसा चुकीचा आहे आणि तो रद्दच केला पाहिजे. यावर आमचा आक्षेप होता आणि यापुढेही राहील. कारण, शहराच्या विकासाच्या दृष्टीने डीपी होत असताना, चार-दोन आरक्षणांना असलेल्या विरोधाला राजकीय भांडवल करुन शहराच्या विकासाला खोडा घातला जात असेल, तर त्यावर आम्ही बोलणारच..!**

#### ताथवडे, दिघीतील केस स्टडी

ताथवडेत एक सोसायटी आहे. सुमारे 900 सदनिकाधारक आहेत. या सोसायटीवर डीपी रस्ता प्रस्तावित केला आहे, असा दावा करण्यात आला. यावरुन गदारोळ माजला. लोकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. राहुल कलाटे यांच्यासारखे अनुभवी नेते या आंदोलनात सहभागी झाले. पण, अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा रस्ता अस्तित्वात असलेला रस्ता आहे. आरक्षण किंवा प्रस्तावित नाही. दिघीमधील धक्कादायक प्रकार, शहरवासीयांचे डोळे उघडवणारा आहे. दत्तगड समर्थनगर, दिघी येथील गार्डनच्या आरक्षणाला स्थानिक नागरिकांचा विरोध आहे. आरक्षणाला विरोध असणे, यात काहीच गैर नाही. पण, त्यासाठी एकगट्टा हरकतींचा आकडा फुगवण्यासाठी चक्क एका अलिझा नावाच्या मुलीची हरकत दाखल केली आहे. या मुलीचा जन्म 2019 मध्ये झाला आहे. अवघ्या 5-6 वर्षांच्या मुलीच्या नावे इंग्रजीमध्ये स्वाक्षरी करुन अर्ज दाखल केला आहे. त्यावर तिच्या पालकाचीही स्वाक्षरी दिसत नाही. याचा अर्थ केवळ आधारकार्ड वापरुन हरकतींचा आकडा कसा मोठा होईल? यावर विशिष्ट मंडळी गेल्या दोन महिन्यांपासून काम करीत होती, हे सिद्ध होते.